| | |
|---|---|
| **MHLA160008222022** | <u>नियमित फौजदारी खटला क्र.८६/२०२२</u><br><u>शासन वि. मंगेश व ईतर</u> |

–:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::–

विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. हाशमी आणि बचाव पक्षाचे विद्वान अधिवक्ता श्री. एम.बी. पाटील यांना सविस्तर ऐकले. अभियोग पक्षाने भारतीय दंड विधानाचे कलम ३२६, ३२४, २९४, ५०६, ३२३, १२० ब व सह कलम ३४ करिता दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. मी पूर्ण दोषारोपपत्र आणि युक्तिवाद याचे काळजीपूर्वक अवलोकन केले. त्यामध्ये गुन्हेगारी कट म्हणजेच भारतीय दंड विधानाचे कलम १२०–अ व ब चे घटक प्रथमदर्शनी स्थापीत होत नाहीत. सदर घटक गृहीत धरता येणार नाहीत. आरोपींच्या समान हेतू बाबत भारतीय दंड विधानाचे कलम ३४ प्रमाणे गुन्हा प्रथमदर्शनी स्थापीत होतो. परंतु त्याआधारे गुन्हेगारी कट स्थापीत होत नाही. सबब भारतीय दंड विधानाचे कलम १२०–ब बाबत दोषारोप निश्चित करता येणार नाही. आरोपींना त्यामध्ये दोषमुक्त करण्यात येते.

०२. आदेश संगणकावर टंकलिखीत केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.07.15 17:36:40 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**
**दिनांक – १५–०७–२०२५** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, देवणी.**